**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-६**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक -१ शुक्रवार दिनांक ३/८/२००७

ठराव क्रमांक -१ शुक्रवार दिनांक ३/८/२००७

**प्रस्तावाचा विषय :-**मा.स्थायी समिती सभा दिनांक २६/६/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुर :-**मा.स्थायी समिती सभा दिनांक २६/६/२००७ रोजी झालेल्या मा.स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे साठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा.स्थायी समिती सदस्यांना सभेच्या अजेंडया बरोबर मागील सभेचे (कार्यवृत्त) इतिवृत्त देण्यांत येते का ?

मा.श्री. जोशी अ.सु. :- मागील सभेचे इतिवृत्त (कार्यवृत्तात) देण्यांत येत नाही.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- ही जुनी प्रथा मोडून नवीन प्रथा चालू करावी.या पुढे सभेच्या अजेंडया बरोबर मागिल सभेचे इतिवृत्ताची प्रत पाठविण्यात येईल.

मा.सभापती साहेब :- मा.उपायुक्त साहेबांनी चांगल्या प्रथा सुरू कराव्यात मा.स्थायी समिती सदस्यांना सभेच्या अजेंडया बरोबर मागिल सभेचे इतिवृत्त देण्यांत यावे त्यामुळे मा.सदस्यांना सभे मध्ये झालेले निर्णय, सभेचे कामकाजाची माहिती मिळेल ते अभ्यास करून पुढील सभेमध्ये त्यावर चर्चा करतील आपली मते मांडतील सुचना सुचवतील.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- मागिल सभेमध्ये दिनांक २५/५/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करतांना वार्षिक निविदा प्रकरणी मी सुचविलेली दूरूस्ती ठरावामध्ये घेतली आहे का?

मा.सभापती साहेब :- आपण सुचविल्याप्रमाणे दूरूस्ती करण्यांत आलेली आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :-वार्षिक निविदा प्रकरणी मा.स्थायी समितीने स्टोअर विभागामार्फत खरेदी करण्यांत येणा-या व मंजूर निविदाकार यांचे कडून स्टोअर पोहोच होणा-या साहित्य माल इत्यादीचे मानांकित उत्पादक कंपणीचे लेटर हेड असलेले बील घेण्यांत यावे अशा बाबत ठराव पारीत केलेला आहे. आपण वार्षिक निविदा मागवितांना उत्पादक, पुरवठादार, अधिकृत विक्रेते यांचे कडून जाहीर निविदा दर मागवितो. पंरतु एखादी कंपणी अनेक प्रकारची उत्पादने करतात त्यांचे अनेक विक्रेते असतात त्या प्रतेंक उत्पादनाचे कंपणीचे लेटर हेड असलेले बील सादर करणे पुरवठादारास शक्य होत नाही.स्टोअर विभागामार्फत खरेदी केलेले साहित्य ओरीजनिल कंपणी चे असले बाबत आपण पाहू शकतो.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- एस्.के.एफ बेअरींगचे आलेले निविदा दर पहाता कंपणीचे ओरीजीनल बेअरींगचे दर व पुरवठा दाराने दिलेला दर या मध्ये बरीच तफावत होती.

मा.श्री. जोशी अ.सु. :- जाहिर निविदा मध्ये एस्.के.एफ बेअरींग चे अधिकृत डिलरचा उल्लेख आहे. मग आपणा कडेस सप्लायर्सचे बील कसे येते.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- एस्.के. एफ बेअरींगचे बंगलोर, चिंचवड ला उत्पादन होते मोठया बेअरींगा सिंगापूरहून येतात. पासष्ठ हजाराची बेअरींग आपण पस्तीस हजारात खरेदी करतो ती ओरीजीनल असते का? ओरीजीनलचे जागी डुप्लीकेट येउ शकते.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- अधिकृत विक्रेते,उत्पादक यांचे निविदा दर आपण मंजूर करतो. सदर माल ओरीजीनल असले बाबत खात्री आपणच करणे आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- आपले नगर मध्ये श्री. शेटे हे एस्.के. एफ बेअरींगचे डीलर आहेत. त्यांनी टेंडर भरणे आवश्यक होते. पंरतु त्यांना त्याची गरज नाही ते टेंडर भरत नाहीत आपण त्यांना टेंडर भरण्यांस भाग पाडावे. एस.के. एफ बेअरींगचे मंजूर निविदाकार हे कंपणीचे अधिकृत पुरवठा दार नाहीत. त्याचे बील आपण स्विकारणार आहोत मात्र म.नपा. मार्फत ओरीजीनल स्पेअर पार्ट, साहित्य इत्यादी खरेदी करण्यांत यावे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- ओरीजीनल व डुप्लीकेट या मधील फरक हा लवकर ओळखू येत नाही. इंजिनिअर अगर त्या क्षेत्रातील एखादी मास्टर व्यक्ति ही ओरीजीनल व डुप्लीकेट मधील फरक लवकर सांगू शकत नाही.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- मी बेअरींगचे कंपणीचे दर पत्रक आनले होते त्या तील दर व पुरवठा दारांनी दिलेले दर या मध्ये बरीचे तफावत होती.

मा.सभापती साहेब :- एकाच बेअरींगचे पुरवठा दारांनी दिलेले दरात मोठी तफावत होती.

मा.श्री. घुले अ.ह. :- डुप्लीकेट बेअरींग सहजा सहजी बसविता येत नाही.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ. :- ॲडजस्ट करून बसवावी लागते

मा.श्री.घुले .अ.ह व मा.श्री. बोरूडे अ.व :- मान्यता प्राप्त फर्मचे बील घेण्यांत यावे. अशी दुरूस्ती करून कार्यवृत्त कायम करणेत यावे.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- आय.एस्.आय. मार्क मान्यता प्राप्त कंपणीचे स्पेअर पार्ट साहित्य इत्यादीची खरेदी करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- स्टोअर विभागामार्फत आय.एस.आय मार्क ,मान्यता प्राप्त, स्टॅन्डर्ड कंपणीचे ओरीजीनल साहित्य, स्पेअर पार्ट इत्यादीची खरेदी करण्यांत यावी. व मा.स्थायी समिती सभा दिनांक २६/६/२००७ रोजी चे ठराव क्रमांक १ मधील मा.स्थायी समिती सभा दिनांक २५/५/२००७ रोजीचे सभेचे अजेंडया वरील विषय क्रमांक दोन अहमदनगर महानगरपालिकेस सन २००७-२००८ सालाकरिता दैनंदिन कामकाजासाठी एस.के. एफ.बेअरींग औषधे इत्यादी वार्षिक खरेदी विषयी पारित केलेल्या ठरावा मध्ये "मंजूर निविदाकार यांचे कडून स्टोअर पोहोच होणा-या साहित्य, माल इत्यादीचे मानांकित उत्पादक कंपणीचे लेटर हेड असलेले बील घेण्यात यावे " या ऐवजी "मान्यता प्राप्त फर्मचे बील घेण्यांत यावे " या प्रमाणे दुरूस्ती करून मा.स्थायी समिती सभा दिनांक २६/६/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यांत यावे.

**प्रस्तावाचा विषय :-**मा.स्थायी समिती सभा दिनांक २६/६/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**ठराव** :- मा.स्थायी समिती सभा दिनांक २६/६/२००७ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करणे विषयी सभेमध्ये झालेल्या साधक बाधक चर्चे नुसार दिनांक २५/५/२००७ रोजीचे सभेचे अजेंडया वरील विषय क्रमांक दोन अहमदनगर महानगरपालिकेस सन २००७-२००८ साला करिता दैनंदिन कामकाजासाठी एस.के.एफ.बेअरींग, औषधे इत्यादी वार्षिक खरेदी विषयी पारित केलेल्या ठरावामध्ये मंजूर निविदाकार याचे कडून स्टोअर पोहोच होणा-या साहित्य, माल इत्यादीचे मानांकित उत्पादक कंपणीचे लेटर हेड असलेले बील घेण्यांत यावे " या ऐवजी " मंजूर निविदाकार यांचे कडून स्टोअर पोहोच होणा-या साहित्य माल इत्यादीचे मान्यता प्राप्त फर्मचे बील घेण्यांत यावे" या प्रमाणे दूरूस्ती करणेत येउन मा.स्थायी समिती सभा दिनांक २६/६/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा .श्री. घुले अ.ह.

अनुमादेक :- मा.श्री. बोरूडे अ.व.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर .**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-६**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक :-२ — शुक्रवार दिनांक.३/८/२००७

ठराव क्रमांक :- २ — शुक्रवार दिनांक ३/८/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे परिवहन सेवेचे टप्पा वाहतुकी साठी मा.शासनाचे दिनांक २०/१२/२००५चे नवीन अधिसुचनेप्रमाणे स्टेज निहाय तयार केलेले दरास मंजुरी मिळणेबाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर शहर बससेवा उपक्रमा बाबत महानगरपालिकेने शासन अधिसुचना क्र. MVR /०६९२/१०३१/ CR/TRA-२ दि.४/७/१९९४ नुसार महानगरपालिकेचे स्थायी समितीची मंजुरी घेउन तिकीटांचे दरपत्रक मंजुरी साठी प्रादेशिक परिवहन कार्यालय नाशिक यांचे कडे पाठविले होते तथापी प्रादेशिक परिवहन कार्यालय नाशिक यांचे दि.१२/१२/०६ चे पत्रानुसार अधिसुचने मध्ये दूरूस्ती होउन नवीन अधिसुचना क्रमांक MVA /०६०४ /१३२८ /CR-७५ /TRT दि.२०/१२/२००५ जारी करण्यांत आलेली असल्याने त्या अधिसुचनेच्या अनुषंगाने नव्याने दरपत्रक तयार करून प्रादेशिक परिवहन प्राधिकरण नाशिक यांचे कडे मंजूरी साठी सादर करावे. तसेच राज्य परिवहन महामंडळाचे दरपत्रकानुरूप प्रमाणित करून घेणे बाबत इकडेस कळविले आहे.

महानगरपालिकेने दि.१२/१२/०६चे पत्रानुसार नव्याने दरपत्रक तयार केलेले असुन प्रादेशिक परिवहन कार्यालय नाशिक यांचेकडे तातडीने मंजूरीसाठी पाठविणे गरजेचे आहे.तरी शासनाने नवीन अधिसुचनेप्रमाणे तयार केलेल्या दरपत्रकास मंजुरी मिळणे कामी मा.स्थायी समितीकडे पाठविणेस प्रस्ताव सादर.

येणे प्रमाणे मॅकेनिकाल इंजि. यांचा दि. १४/१२/०६ रोजीचा अहवाल असे.

मा.उपायुक्त साहेब (कर):- मा.शासनाच्या गृह विभागाकडील अधिसुचना दि.२० डिसेंबर २००५ अन्वये नव्याने टप्पा वाहतुकी साठी किमान व कमाल दर निश्चित केलेले आहेत. या अधिसुचने प्रमाणे अहमदनगर म.न.पा.च्या परिवहन सेवेचे तिकीट दर निश्चित करणे साठी प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे ठेवणे. योग्य राहिल मान्यतेस्तव सादर. दि१६/१२/२००६

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही.

अहमदनगर महानगरपालिका, दि.२०/१२/२००५ चे अधिसुचने प्रमाणे
* स्टेज निहाय दरपत्रक *

| किमान व कमाल दर अधिसुचना क्र. एम. व्ही. ए./०६०४ /१३२८/सी.आर.७५ | | | प्रस्तावीत दर रूपयांत | | |
|---|---|---|---|---|---|
| टी.आर.टी.ए.-२ दिनांक २०/१२/२००५ प्रमाणे | | | | | |
| किलो मीटर Exceeaing Notexceeding | किमान रूपये | कमाल रूपये | कि.मी | प्रौढ | मुले |
| २ किलोमीटर पर्यत | २=०० | ८=०० | २=०० | ३=०० | २=०० |
| २-०० ते ४-० किलो मीटर पर्यत | ३=०० | १०=०० | २.०० ते ४.०० | ४=०० | २=०० |
| ४.०० ते ६.०० कि.मी .मीटर | ४=०० | १४=०० | ४.० ते ६.०० | ५=०० | ३=०० |
| ६.० ते १०.० कि.मी.पर्यत | ५=०० | १८=०० | ६.० ते ८.०<br>८.० ते १०.० | ६=००<br>७=०० | ४=००<br>४=०० |
| १०.० ते १४.० कि.मी .पर्यत | ७=०० | २२=०० | १०.० ते १२.०<br>१२.० ते १४.०० | ८=००<br>९=०० | ४=००<br>५=०० |

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे परिवहन सेवेचे टप्पा वाहतुकी साठी मा.शासनाचे दिनांक २०/१२/०५ चे नवीन अधिसुचने प्रमाणे स्टेज निहाय तयार केलेले दरास मंजुरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. तिवारी सु.र. व मा.श्री. घुले अ.ह. :- महानगरपालिकेने बससेवेचे ठेकेदार यांचेशी केलेल्या कराराची प्रत स्थायी समिती सदस्यांना देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

मॅके.इंनिजिअर श्री. निकम पी.जे. :- मा.शासनाचे सन १९९४ सालचे जी.आर प्रमाणे बससेवेचे तिकीटांचे दरपत्रक प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे मंजूरी साठी पाठविले होते. परंतु त्यांनी सन २००५ चे जी.आर प्रमाणे दरपत्रक तयार करून मंजूरसाठी सादर करणे बाबत कळविल्याने सन २००५ चे जी.आर प्रमाणे दरपत्रक तयार केलेले आहे. त्यास मा.स्थायी समितीची मंजूरी मिळणे साठी प्रस्ताव सादर केलेला आहे. यात फक्त स्टेजचे अंतरात बदल झालेला आहे. बसचे दरामध्ये बदल झालेला नाही.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं :- यामध्ये कमाल व किमान दर दर्शविलेले आहेत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :-जकातीचे जसे कमाल व किमान दर ठरविलेले आहेत.त्याच प्रमाणे हे कमाल व किमान दर ठरविलेले आहेत.या मध्ये फक्त स्टेजचे अंतरात बदल झालेला आहे. दरामध्ये बदल झालेला नाही.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- कमाल व किमान दरास, ऑफीस रिपोर्टास मंजूरी दिली तर जादाचे दरास मंजूरी दिल्यासारखे होईल. आपणास ७.२% रॉयल्टी मिळते. सेवाकर आपणच भरावयाचा किंवा ठेकेदाराने भरावयाचा आहे.

मॅके.इंजिनिअर श्री. निकम पी.जे. :- प्रवासी ठेकेदार भरतात सेवाकर ही त्यांनीच भरावयाचा आहे. त्या प्रमाणे करारनाम्या मध्ये तसा उल्लेख आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- करारनाम्याची प्रत मा.स्थायी समिती सदस्यांना देण्यांत यावी.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.ह. :- हा ठेकेदार म.न.पा. हद्दी बाहेर बस सेवा पुरवितो आहे. त्यामुळे कराराचा भंग होतो आहे अशी माझी तक्रार आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- काही अघटीत घटना घडली तर काय ?

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- आपले कडेस अशाबाबत तक्रारी आल्या आहेत का?

मॅके.इंजिनिअर श्री. निकम पी.जे. :- नाही मा.शासनाची बस सेवेस मंजूरी आलेली आहे. त्यानुसार बससेवा चालू आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- ठेकेदाराने परवानगी व्यतिरिक्त हद्दीबाहेर बस सेवा पुरवू नये अशा बाबत सभे मध्ये झालेल्या चर्चे नुसार बस सेवेचे ठेकेदार यांना पत्र द्यावे. कराराचा भंग होत असल्यास नोटीस द्यावी कार्यवाही करावी.बसचे जुने दर आहेत तेच आकारण्यांत यावे असे ही त्यांना कळवावे.

मा.श्री. जोशी अ.सु., मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ. व मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- सदरचा प्रस्ताव पुढील मिटींग मध्ये निर्णयास घ्यावा तो पर्यत तो तहकुब ठेवावा.करारनाम्याच्या प्रती सदस्यांना द्याव्यात

मा.श्री. बोरूडे अ.व. :- पुढील सभेत निर्णयासाठी घ्यावा.

मा.सभापती साहेब :- सदर प्रस्ताव सर्वानुमते तहकुब ठेवावा. तो पुढील सभे मध्ये निर्णयासाठी घेण्यात यावा. बस सेवेच्या करारनाम्याच्या प्रती मा.स्थायी समिती सदस्य यांना देण्यांत याव्यात.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे परिवहन सेवेचे टप्पा वाहतुकी साठी मा.शासनाचे दिनांक २०/१२/२००५ चे नवीन अधिसुचने प्रमाणे स्टेज निहाय तयार केलेले दरास मंजुरी मिळणे बाबत कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार सदर प्रस्ताव पुढील सभे मध्ये निर्णयासाठी घेण्यांत यावा. तो पर्यत सदर प्रस्ताव तहकुब ठेवण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. जोशी अ.सु.

अनुमोदक :- मा.श्री. बोरूडे अ.व.
ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-६**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक -३ शुक्रवार दिनांक ३/८/२००७

ठराव क्रमांक-३ शुक्रवार दिनांक ३/८/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पिंपळगांव योजनेचे जुने पाईप काढणे व खाजगी संस्थे मार्फत टाकणे ही कामे रद्य करून आगरकर मळा पाणी पुरवठा योजने अंतर्गत शिवनेरी चौक ते पाण्याचे टाकी पर्यत जल वाहिनी टाकणे कामी ३५० एम.एम.व्यासाचे डी. आय.के ९ क्लास पाईप खरेदी कामी जाहिर निविदा मागविणेस व रक्कम रूपये ११,१९,६४०/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय-आगरकर मळा पाणी पुरवठा योजने अंतर्गत शिवनेरी चौक ते पाण्याच्या टाकी पर्यत जलवाहिनी टाकणे.

मा.सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, आगरकर मळा स्मृती कॉलनी येथे १० लक्ष लिटर्स क्षमतेच्या पाण्याच्या टाकीचे काम पुर्ण झालेले असुन शिवनेरी चौक ते पाण्याची टाकी पर्यत जलवाहिनी टाकण्याचे कामाकरिता पिंपळगांव पाणी पुरवठा योजने मधील जुने सी.आय.पाईप काढणेचे काम केडगांव मजूर सहकारी संस्था मर्या. अ.नगर या एजन्सीस देण्यांत आलेले आहे. सदरचे काम एकूण रू.८५,६४०/- रकमेचे आहे.

तसेच सदरचे पुरविलेले पाईप खोदकाम करून जोडणे करिता सुरिक्षित बेरोजगार अभियंता श्री. पंकज जहागिरदार या ठेकेदारास कार्यादेश देण्यांत आलेले आहे. या कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ६,८५,८८२/- इतकी आहे.

सद्यस्थितीत पिंपळगांव पाणी पुरवठा योजनेचे पाईप काढण्याचे काम केडगांव मजूर संस्थेमार्फत ३१० इतके रनिंग मीटर झालेले असुन उर्वरीत ४६० इतके रनिंग मीटर पाईप काढणे बाकी आहेत.अद्याप पर्यत एकूण ३१० रनिंग मीटर ३७५ मि.मी. व्यासाची सी.आय.पाईप काढण्यात आलेली असुन त्यातील काही पाईप वसंत टेकडी येथुन काढण्यात आलेले आहेत. व काही पाईप पिंपळगांव तलाव येथून काढण्यात आलेले आहेत. उर्वरित पाईप काढणे करीता खालील प्रमाणे अडचणी येत आहेत.

१] सध्या अस्तित्वात असलेले जुने पाईप हे किमान १५ ते २० फुट खोल असुन ते काढण्या करीता १५ ते २० फुट खोल खोदाई करावी लागत आहे व तळापाशी किमान १० फुट रूंदीचा खड्डा घ्यावा लागणार आहे. या करीता मोठया प्रमाणात खोदाई करण्याची गरज आहे.व त्या करिता खोदाई करणे व क्रेनच्या साहय्याने काढुन वहातुक करण्या करिता नव्याने अंदाजपत्रक केल्यास अंदाजपत्रकीय रक्कम रू.७,५३,४४६/- इतकी होत आहे.

२] उपरोक्त ठिकाणचे पाईप काढतांना मोठया प्रमाणात पाईपची तुटफुट होत आहे. व त्यामुळे पिंपळगांव येथुन पाईप काढतांना व त्याची वहातुक करून आगरकर मळा येथे जोडतांना मोठया प्रमाणात तुटफुट होत असल्याने बरेचशे पाईप वाया जात आहेत.

३] पिंपळगांव येथील काढण्यात आलेले जुने सी.आय.पाईप आतुन मोठया प्रमाणात गंजलेले आहेत. व त्यामुळे Friction Loss होवुन Pressure Head कमी होण्याची शक्यता आहे.

४] जुने पाईप काढतांना त्यास सुक्ष्म चिरा (Hair Crack) असण्याची शक्यता आहे. व अशा बरिक चिरा सहजासहजी डोळयांनी दिसत नाही व त्याद्वारे पाईप जोडल्यांनतर व पाणी पुरवठा सुरू झाल्यानंतर लिकेज राहण्याची शक्यता आहे.

तसेच पिंपळगांव येथुन जुने पाईप काढणे (उर्वरित अंदाजे ४६० मीटर) ते क्रेनच्या साहाय्याने काढुन आगरकर मळा येथे वहातुक करणे करिता एकूण रू. ७,५३,४४६/- इतका खर्च अपेक्षित आहे. व तसेच उर्वरीत अंदाजे ४६० मीटर सी.आय.पाईप खोदकाम करून जोडणे करीता एकूण रू.६,५५,९५४/- खर्च अपेक्षित आहे.

वरील दोन्ही कामे मिळुन एकूण रू.१४,०९,४००/- खर्च अपेक्षित आहे. आगरकर मळा येथील पाणी पुरवठा योजने करिता उर्वरित पाईप टाकणे करिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे दर-करार असलेल्या जिंदाल सॉ.लि.या कंपनी कडून ३५० मि.मी. व्यासाचे ४६० मीटर लांबीचे डि.आय.पाईप खरेदी केल्यास त्यास एकूण १०,५०,३२३/- रूपये इतका खर्च अपेक्षित आहे. व उर्वरित खोदाई करणे व म.न.पा. मार्फत पुरविलेल्या ३५० मि.मी.व्यासाची D.I. पाईप जोडणेच्या कामास एकूण रू.१,८५,४४१/- इतका खर्च अपेक्षित आहे.

त्यानुसार मंजूर प्रस्तावा नुसार जुने सी.आय.पाईप काढून ते जोडण्याच्या कामास मोठया प्रमाणात अडचणी येत आहेत. तरी पिंपळगांव येथील जुने पाईप काढण्याचे काम रद्द करून सदरील कामाची एजन्सी केडगांव मजूर सहकारी संस्था, अ.नगर यांनी अद्याप पर्यत केलेल्या कामाचे देयक अदा करणेस तसेच सी.आय.पाईप खोदकाम करून जोडणेच्या कामास नियुक्त करण्यात आलेले श्री.पंकज जहागिरदार या एजन्सीचे अद्याप पर्यत कामाचे देयक करणेस व दोन्ही कामे आहे. त्या स्थितीत रद्द करावे लागतील उर्वरित ३५० एम.एम. डि.आय. पाईप ४६० र.मी. महाराष्ट जीवन प्राधिकरण कडील दर-करार असलेल्या एजन्सी कडून खरेदी केल्यास रू.१०,५०,३२३/- व सदरचे पाईप खाजगी संस्थेकडून खर्च रू.१,८५,४४१/- असे एकूण रू. १२,३५,७६४/- इतका खर्च येईल.

त्यानुसार मंजूर प्रस्तावानुसार जुने पाईप काढून टाकल्यास एकुण रू.१४,०९,४००/- इतका खर्च येईल व म.जि.प्रा.च्या दर करार असलेल्या एजन्सीकडून खरेदी केल्यास रू.१२,३५,७६४/- इतका खर्च येईल. त्यामुळे म.न.पा. ची रू.१,७३,६३६/-इतकी रक्कम बचत होणार आहे. व सदर ठिकाणी जुन्या पाईपचे ऐवजी नवीन टिकावू पाईप टाकता येतील.

तरी आगरकर मळा येथील पाणी पुरवठा योजनेकरिता म.जि.प्रा.कडील दरकरार असलेल्या एजन्सीकडून पाईप खरेदी करणे, व खाजगी एजन्सीकडून जोडणेच्या कामास व रक्कम रू.१२,३५,७३४/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळावी तसेच पिंपळगांव योजनेचे जुने पाईप काढणे व खाजगी संस्थेमार्फत टाकणेचे काम रद्द करणेबाबत मंजूरी मिळणेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

| | |
|---|---|
| लेखाशिर्ष :- | शहरात नवीन पा.ला.टाकणे |
| तरतूद :- | रू. १,५५,००,०००/- |
| पुर्वी चा खर्च :- | रू.७,४९,७१०/- |
| प्रस्तावीत खर्च :- | रू. १५,९४,८४१/- |
| एकूण खर्च :- | रू.२३,४४,५५१/- |
| शिल्लक :- | रू. १,३१,५५,४४९/- |

येणे प्रमाणे शाखा अभियंता श्री. आर.जी.मेहेत्रे यांचे अहवाल असे

शहर अभियंता श्री.एन.बी.मगर :- **अहवालाप्रमाणे पिंपळगांव पाणी पुरवठा योजनेचे जुने पाईप काढून आगरकर मळा येथे शिवनेरी चौक ते नवीन पाण्याची टाकी येथे टाकण्याचे काम रद्द करून त्याऐवजी म.जी.प्राधि.कडील दरकरार असलेल्या एजन्सीकडून (जिन्दाल सॉ) ३५० एम.एम.व्यासाचे डी.आय.पाईप खरेदी करून व खाजगी एजन्सीकडून पाईप टाकण्याचे काम करणे योग्य वाटते. त्यासाठी एकूण खर्च रू.१२,३५,७३४/- अपेक्षित आहे. पाईप खरेदीस व खोदाई करून टाकणेच्या कामास प्रशासकीय मान्यता देणे योग्य वाटते. निर्णयास्तव सादर.** दि.९/५/०७

अंतर्गत लेखा परिक्षक :-सादर, शहर अभियंता यांचे कडील प्रस्तावा **'अ'** प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही. दि.१४/५/०७

मा.उपायुक्त साहेब (सा) :- पाईप पुरवठा व इतर कामाचे वेगवेगळे अंदाज पत्रक तयार करून त्वरीत सादर करावे मुळातच प्रस्ताव उशिरा का ठेवला? म.जि.प्रा.चे सध्याचे मंजूर दर काय आहेत ? ३ दिवसात परिपूर्ण प्रस्ताव सादर करा दि.१७/५/०७

**विषय :-** आगरकर मळा पाणी पुरवठा योजने अंतर्गत शिवनेरी चौक ते पाण्याच्या टाकीपर्यत जलवाहिनी टाकणे. दि.२९/६/०७

मा.फेरसादर,

विनंती रिपोर्ट फेरसादर की, आगरकर मळा पाणी पुरवठा योजनेकरिता ३५० एम.एम.व्यासाची डि.आय.के-९ क्लास पाईप शासकीय दर करारानुसार खरेदी करणे करिता म.जि.प्रा. कडेस चौकशी केली असता म.जि.प्रा.चा अद्यापपर्यत कुठल्याही एजन्सीची दर कराराने पाईप खरेदीबाबत टेंडर मजूर झाले नसल्याचे समजते, त्यामुळे शासकीय दर करारानुसार पाईप खरेदी करणे शक्य होणार नाही.

३५० एम.एम.व्यास चे डि.आय. के-९ क्लासचे दराबाबत बाजारात चौकशी केली असता रू.२४३४/- (अक्षरी रू. दोन हजार चारशे चौतीस मात्र) प्रति रनिंग मीटर इतका दर असल्याचे समजते.

तरी आगरकर मळा पाणी पुरवठा योजनेकरिता पिंपळगांव पाणी पुरवठा योजनेतील जुने पाईप काढणे शक्य नसल्यामुळे त्याऐवजी ३५० एम.एम. डी.आय.के-९ क्लासचे पाईप खरेदकरिता जाहीर निविदा मागविणेबाबत व त्याकामी अंदाजे अपेक्षित खर्च रक्कम रू.११,१९,६४०/- (अक्षरी रू. अकरा लाख एकोणवीस हजार सहाशे चाळीस मात्र) चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता श्री. आर.जी. मेहेत्रे यांचा अहवाल फेर सादर असे.

मा.शहर अभियंता श्री.एन.बी.मगर :-**अहवालप्रमाणे रक्कम रूपये ११,१९,६४०/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणे योग्य** दि.२९/६/०७

अंतर्गत लेखा परिक्षक :-फेर सादर प्रस्ताव **'अ'** प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही दि.२९/६/०७

मा.उपायुक्त साहेब (सा) :- 'अ' प्रमाणे आदेशार्थ सादर.

मा.आयुक्त साहेब :- सी.इ. दिनांक ३/०७/२००७

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पिंपळगांव योजनेचे जुने पाईप काढणे व खाजगी संस्थे मार्फत टाकणे ही कामे रद्द करून आगरकर मळा पाणी पुरवठा योजने अंतर्गत शिवनेरी चौक ते पाण्याचे टाकी पर्यत जल वाहिनी टाकणे कामी ३५० एम.एम.व्यासाचे डी. आय.के ९ क्लास पाईप खरेदी कामी जाहिर निविदा मागविणेस व रक्कम रूपये ११,१९,६४०/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. तिवारी सु.र.:- प्रस्ताव मंजूर करावा.

मा.श्री. शेख आ.शे.र. :- पाण्याचा विषय आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- पिंपळगाव तलावाची पाईप लाईन खोल आहे. ते पाईप रवोदाई करून बाहेर काढून ठेवले. काही चोरीला गेले. काही फुटले आहेत. हेच पाईप तसेच ठेवले असते तर ते उपयोगी पडले असते. या प्रकरणी म.न.पा.चे नुकसान झालेले आहे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- सदर प्रकरणी पाईप खरेदी साठी जाहिर निविदा काढणेस मंजूरी मिळणे साठी हा प्रस्ताव सादर केलेला आहे. मग जनरल बोर्डा मध्ये पाईप खरेदी साठी मंजूरी दिलेली होती त्याचे काय झाले.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा पाईप खरेदीचा करार संपलेला आहे.या प्रकरणी पाईप खरेदीसाठी निविदा दर मागविणे आहेत.

मा.श्री. जोशी अ.सु. :- निविदा दर जास्तीचे आल्यास काय करणार.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. : ही टाकी पूर्वी च बांधलेली आहे.

मा.श्री. घुले अ.ह. :- चार वर्षापूर्वी टाकीचे बांधकाम झालेले आहे.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब :- आकरा लाखाचे खर्चास प्रशासकीय मंजूरी कशा साठी घेणे आहे.

शहर अभियंता श्री.मगर :- म.जी.प्रा.चा जिन्दाल कंपणीशी असलेल्या कराराची मुदत संपलेली आहे.या कामासाठी पाईप खरेदी करणे आवश्यक आहे. त्या साठी जाहिर निविदा मागविणेचे प्रस्तावास व खर्चास मंजूरी मिळणे साठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब :- जिन्दाल या कंपन्या सारख्या आणखी कंपण्या आहेत. कमीचे दराने खरेदी करणे आवश्यक आहे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- पाईप खरेदीस जनरल बोर्डाने मंजूरी दिली होती. पंरतु म.जि.प्रा.चा जिन्दाल कंपणीशी असलेल्या कराराची मुदत संपलेली असल्याने हया पाणी पुरवठा योजने साठीचे खर्चास प्रशासकीय मंजूरी देणे आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- पंधरा दिवसापुर्वी महात्मा फुले चौक ते ढोर वस्ती, महात्मा फुले चौक ते सारस पुला पर्यत पाईप लाईनचे कामाचे टेंडर काढले होते ते टेंडर कुनीही भरलेले नाही. त्या कामासाठीचे पाईप खरेदी ची ही कार्यवाही या सोबतच पूर्ण करावी.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- आगरकर मळा व मा.श्री . त्रिपाठी साहेब यांचे वार्डातील कामासाठी पाईप खरेदी करिता एकत्रीत निविदा मागवाण्यात. तसेच रवोदाई साठी ही स्वतंत्र निविदा मागविणे विषयी कार्यवाही करणेत येईल.

मा.श्री. जोशी अ.सु. :- पाईप खरेदी विषयी उत्पादक कंपण्याची म.न.पा ने करार करावा.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- कानपुर, कलकत्ता येथील उत्पादक कंपन्या आहेत. त्यांचे सप्लायर्स नेमलेले असतात त्याचे मोठाले व्यवहार असतात ते आपल्याशी करार करणार नाहीत.

मा.सौ. काळे गि.सु. :- तेथील नागरिक चार वर्षापासून काम पूर्ण होण्याची वाट पहात आहेत दिवाळी पूर्वी हे काम पूर्ण व्हावे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- पाईपचे पुरवठादार भरपुर आहेत पाईप मुळे हे काम अडणार नाही हे पाहू.

मा.श्री. घुले अ.ह. व मा.श्री. बोरूडे अ.व.:- प्रस्ताव मंजूर करण्यांत यावा.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव सर्वानुमते मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पिंपळगांव योजनेचे जुने पाईप काढणे व खाजगी संस्थे मार्फत टाकणे ही कामे रद्य करून आगरकर मळा पाणी पुरवठा योजने अंतर्गत शिवनेरी चौक ते पाण्याचे टाकी पर्यत जल वाहिनी टाकणे कामी ३५० एम.एम.व्यासाचे डी. आय.के ९ क्लास पाईप खरेदी कामी जाहिर निविदा मागविणेस व रक्कम रूपये ११,१९,६४०/- (रूपये अकरा लाख एकोणीस हजार सहाशे चाळीस फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

तसेच सदर कामा सोबत मा.स्थायी समिती सदस्य मा.श्री. त्रिपाठी सु.च. यांचे प्रभागातील महात्मा फुले चौक ते ढोर वस्ती, महात्मा फुले चौक ते सारस पुला पर्यत पाईप लाईन टाकणे साठी आवश्यक पाईपचे खरेदी व खोदाई कामी जाहिर निविदा मागविण्यांत याव्यात.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. घुले अ.ह.

अनुमादेक :- मा.श्री. बोरूडे अ.व.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-६**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक -४ शुक्रवार दिनांक ३/८/२००७

ठराव क्रमांक -४ शुक्रवार दिनांक ३/८/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील सारसनगर, पुनम मोतीनगर, भवानीनगर तसेच बुरूडगांव रोड वरील भोसले आखाडा परिसर माणिकनगर, औसरकर मळा, कोठी परिसर इत्यादी भागासाठी पाणी पुरवठा योजना राबविणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्यावरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय :- अहमदनगर म.न.पा. हद्दीतील सारसनगर, पुनम मोती नगर, भवानी नगर, सारसनगर, तसेच बुरूडगांव रोडवरील भोसले आखाडा- परिसर, माणिक नगर, औसरकरमळा, कोठी परिसर इ.भागासाठी पाणी पुरवठा योजना राबविणे बाबत.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, सदरचे प्रस्तावीत कामाबाबत म.न.पा.ने दि. १७/९/२००६ रोजी जाहीर निविदा मागविल्या असता एकूण ४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या पैकी ठेकेदार श्री. बी.एस्. बुजबळ यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजे २९.९९ % अधिकची आहे. त्यानंतर त्यांना समक्ष बोलावून वाटाघाटी केल्या असता त्यांनी निविदा दरापेक्षा १५% जादा दराने काम करणेचे मान्य केले होते. सदर अंदाजपत्रक हे सन२००५-०६ च्या म.जी.प्रा.च्या दरसुचीनुसार करणेत आले होते. सदर अंदाजपत्रकाची सन २००६-०७ च्या दरसुचीशी तुलना करता २७.३५% जादा असुन आलेले न्युनतम दर हे अवाजवी आहेत. सदर दराबाबत श्री. भुजबळ यांनी निविदा दरापेक्षा १५% जादा दराने काम करणेचे मान्य केले होते. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,अ.नगर यांना इकडील जा.क्र. सा.बां.१८८१ दि. ३/२/०७ अन्वये कळविले असता त्यांचेकडील जा.क्र./तांत्रीक शाखा-१/९५७ दि.१७/३/०७ अन्वये सन२००६-०७ चे दरसुचीतील दरांशी तुलना करता निविदा दरापेक्षा १०.१२%जादा दर येत असलेबाबत अभिप्राय दिलेला आहे.

त्यानंतर मे.बी.एस.भुजबळ यांनी दि.२३/३/०७ रोजी इकडेस पत्र देवून सदर कामासाठी लागणारे सिमेंट, स्टीलचे भाव सध्या वाढलेले आहेत, त्यामुळे निविदेतील दरापेक्षा जास्त खर्च या कामास येत असलेने माझे आर्थिक नुकसान होईल. त्यामुळे सदर काम करणेस तयार नसलेबाबत कळविलेले आहे. त्यांनतर सदर कामाची फेरनिविदा मागविणेचे ठरले.

सदर कामाची दि.२१/४/०७ रोजी फेरनिविदा मागविण्यात आलेल्या असुन सदर कामासाठी मुदतीत दोन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या, सदर सिलबंद निविदा फोडल्या असता त्यामध्ये मे.ए.सी.कोठारी,अ.नगर यांची २६.७० % अधिकची परंतु सर्वात लोएस्ट दराची निविदा प्राप्त झाली आहे.

सदर निविदेचे अंदाजपत्रक हे म.जि.प्रा. च्या सन २००५-०६ चे दरसुचीनुसार करणेत आले असल्याने त्याची म.जि.प्रा. च्या २००६-०७ च्या दरसुचीशी तुलना केली असता ते ७.६२% जादा (मुळ अंदाजपत्रकापेक्षा) येत आहे. तसेच शासनाच्या नवीन परिपत्रकाप्रमाणे (सा.बां.मं.ना./प्रशा४/२९५४/२००७ दि.२४/३/२००७) दि.१/५/०७ पासून सिमेंट व स्टीलचे सुधारीत दर लागू केलेले आहेत, त्यानुसार दर पृथः करण केले असता मूळ अंदाजपत्रकापेक्षा १५.१५% जादा दराने होत आहे.

ठेकेदार यांनी निविदा २६.७०% अधिकने भरलेली आहे.सदर अंदाजपत्रक नवीन दरसुचीनुसार व प्राप्त झालेल्या परिपत्रकाप्रमाणे (दरसूची) केले असता ते १५.१५ % मुळ निविदेपेक्षा अधिक येत आहे. तसेच ठेकेदार श्री.ए.सी.कोठारी यांना त्यांचे १९/६/०७ चे पत्रान्वये सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९९% जादा दराने करण्यास तयार असलेबाबत कळविले आहे, म्हणजेच सदर दर सन २००६-२००७ दरसुचीपेक्षा १.८४% जादा येत असल्याने दर वाजवी वाटतात.

तरी सदरचा प्रस्ताव छाननी समितीपुढे निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाणे उपशहर अभियंता यांचा अहवाल असे दि. १८/६/०७

शहर अभियंता श्री.मगर एन.बी. :-अहवालाप्रमाणे सर्वात कमी दराचे निविदा दर हे मुळ अंदाजपत्रकापेक्षा २६.७०% ज्यादा आहेत(सन २००५-२००६)सदर कामाचे प्रचलीत २००६-२००७ दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार केले असुन ते मुळ अंदाजत्रकापेक्षा १५.१५% ज्यादा आहे. ठेकेदाराने सदर काम मुळ अंदाजपत्रकापेक्षा १६.९९% ज्याद दराने काम करण्यास लेखी संमती दिली आहे. म्हणजे २००६-०७ च्या दरसुचीपेक्षा १=८४% ज्यादा दराने काम करण्यास संमती दिली आहे. सदर दर वाजवी वाटतात. निर्णयास्तव सादर. दि.२२/६/०७

अं.लेख परिक्षक :- सादर, छाननी समिती पुढे ठेवणेस हरकत नाही दि.२२/६/०७

फेर सादर,

**निविदा दरपत्रके दि.२६/६/०७ चे छाननी समितीपुढे ठेवली असता सदर काम निविदा धारक मे.ए.सी.कोठारी अ.नगर यांना सन २००६-२००७ चे दरसुचीपेक्षा १.८४ % जादा दराने देणेची छाननी समितीकडून शिफारस करणेत येत आहे. मंजूरीस्तव सादर.**

येणे प्रमाणे उपशहर अभियंता श्री. सातपुते आर.जी. यांचा अहवाल असे

शहर अभियंता श्री.मगर एन.बी. :- छाननी समितीच्या शिफारसी नुसार मंजूरीस्तव सादर दि.२७/६/०७

अं.लेखा परिक्षक :- शहर अभियंता यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे व छाननी समितीचे निर्णया प्रमाणे मा.स्थायी समितीने निर्णय घेणेस हरकत नाही. दि.३/७/०७

मा.उपायुक्त साहेब (सा ):- **'अ'** प्रमाणे मान्यतेस सादर दि.४/७/०७

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही. दि.५/७/०७

**फेर निविदा (DSR-०५-०६)**

| अ.नं | निविदा धारकांचे नांव | आलेले निविदा दर |
|---|---|---|
| १. | इलेक्ट्रीकल ॲन्ड इंडस्ट्रीअल एन्टरप्रायझेस | ३५ % जादा |
| २. | मे.ए.सी. कोठारी | २६.७०% जादा |

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सारसनगर, पुनम मोतीनगर, भवानीनगर तसेच बुरूडगांव रोड वरील भोसले आखाडा परिसर माणिकनगर, औसरकर मळा, कोठी परिसर इत्यादी भागासाठी पाणी पुरवठा योजना राबविणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्यावरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :-ऑफीस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्या प्रमाणे ऑफीस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब :- सदर पाणी पुरवठा योजने अंतर्गत कोण कोणती कामे करावयाची आहेत ते शहर अभियंता यांनी सांगावे.

शहर अभियंता श्री.मगर एन.बी.:-या योजने अंतर्गत संपवेलचे तसेच पाण्याच्या टाकीचे बांधकाम आणि ३००मी.मी. डी.आय.के पाईप लाईनचे काम करणे आहे.त्या कामासाठी निविदा मागविलेल्या आहेत.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. व मा.श्री. तिवारी सु.र. :- या पाणी पुरवठा योजनेची किती रकमेची कामे करावयाची आहेत याचा ऑफीस रिपोर्टा मध्ये उल्लेख नाही.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- महाराष्ट्र जिवन प्राधिकरणा कडून पाणी पुरवठा योजना आपण ताब्यात घेतली आता प्रतेंक कामासाठी आपण त्यांचे कडेस विचारणा करतो. त्याची मते मागवितो त्या काळात साहित्याची दरवाढ होते त्यामुळे खर्च वाढतो. कामे मुदतीत पूर्ण व्हावीत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- डि.एस.आर रेटला आपण मा.महासभेची मंजूरी घेतो का?

मा.श्री.जोशी अ.सु. :- डि.एस.आर.रेटला महासभेची मंजूरी घेतली जात नाही.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- चार पांच वर्षापासून ठेकेदाराची बीले मंजूर होत नाहीत त्या मुळे कामे पूर्ण झालेला नाहीत. बांधलेल्या टाकी पासून नागरिकांना पाणी पुरवठा होत नाही.

मा.श्री. जोशी अ.सु. :-मोठ मोठी कामे हाती घ्यावीत व ती मुदतीच पूर्ण करावीत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- पाणी पुरवठा, बांधकाम अशा क्षेत्रातील नामांकित व्यक्ति संस्था आहेत आपल्या कामांची टप्प्या टप्प्याने बीले देण्यांच्या पध्दती मुळे ठेकेदारांची बीले वेळेत दिली जात नाहीत त्यामुळे कामे लवकर पूर्ण होत नाहीत.

मा.श्री. जोशी अ.सु. :- करावयाची कामे एक मताने व्हावीत

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- कामे मुदतीतच व्हावीत ठेकेदारांची रनिंग बीले वेळचे वेळी द्यावीत म्हणजे कामे लवकर होतील तशीच छोटी छोटी कामे ही वेळेत व्हावीत.

मा.श्री. जोशी अ.सु. :- आर्थिक कुबत नसतांना आपण कामे करीत आहोत. नियोजना अभावी कामे अपूर्ण रहातात लवकर पूर्ण होत नाहीत. हा विषय मंजूर करावा.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ. :- हे काम कोणत्या तरतूदी मधून होणार आहे.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- म.न.पा. फंडातून काम करणार आहोत. अंदाजपत्रकामध्ये टाकी बांधणे साठी तरतूद रूपये एक कोटी पांच लाख, लालटाकी पाण्याची टाकी बांधणे साठी तरतुद रूपये पन्नास लाख व मनपा फंडातील पंचावन्न लाख अशी एकूण दोन कोटी पांच लाखाची तरतूद असून आपंणास दोन पाण्याचे टाक्याचे कामांसाठी अंदाजे खर्च रूपये एक कोटी पन्नास लाख लागतात दोन कोटी पांच लाखाचे तरतुदी मधून ही कामे होतील. खर्च वाढल्यास पुर्नविनियोजित अंदाजपत्रकाचे मंजूरीचे वेळी हया तरतुदीत फेरबदल करता येतील.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ. :- या दोनही कामासाठी असलेली बजेट तरतुद पुरणार नाही लालटाकीचे कामासाठी च रूपये एक कोटी पंचवीस लाख लागतील हया टाकी साठी तरतुद रहाणार नाही. प्रथम तरतुद करावी. मग कामास मंजूरी द्यावी.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- आपले कडे मागासवर्गीय कल्याण निधीचे चार कोटी शिल्लक आहेत.पूर्नविनियोजित अंदाजपत्रक मंजूरीचे वेळी ही तरतुद आवश्यकते प्रमाणे असलेल्या बजेट हेड वर वळविता येईल.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करावा.

मा.श्री.शेख मुदस्सर अ.इ.:- हया कामांसाठी तरतुद कमी असलेने प्रस्ताव मंजूरीस माझा विरोध नोंदवावा.

मा.श्री. जोशी अ.सु. :- विरोध न नोंदवता सुचना म्हणावी.

मा.श्री.बोरूडे अ.व./ मा.श्री. घुले अ.ह. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ. :- नाही माझा विरोधच नोंदवावा.

मा.सभापती साहेब :- विषय बहुमताने मंजूर.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सारसनगर, पुनम मोतीनगर, भवानी नगर तसेच बुरूडगांव रोड वरील भोसले आखाडा परिसर माणिक नगर औसरकर मळा कोठी परिसर इत्यादी भागासाठी पाणी पुरवठा योजना राबविणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केलेल्या. स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा धारक मे.ए.सी. कोठारी अहमदनगर यांचे सन २००६-२००७ चे दर सुची पेक्षा एक पूर्णांक चौ-याऐंशी टक्के जादाचे निविदादरास मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफीस रिपोर्ट मंजूर.

नियमा नुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा. श्री. घुले अ.ह.

अनुमादेक :- मा.श्री. बोरूडे अ.व.
ठराव बहुमताने मंजूर.

सदरचे प्रस्ताव मंजूरीस मा.स्थायी समिती सदस्य मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ. यांचा विरोध.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-६**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक -५ शुक्रवार दिनांक ३/८/२००७

ठराव क्रमांक -५ शुक्रवार दिनांक ३/८/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सिध्दार्थनगर पाणी पुरवठा योजने अंतर्गत सिध्दार्थ नगर येथे २० लक्ष लिटर क्षमेतेची पाण्याची टाकी बांधणे संपवेल, पंपींग मशिनरी व पाईप लाईन टाकणेचे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजनेचे तरतूदी मधून करणेचे कामास एस्टीमेट रूपये ९०,४१,३४१/- चे खर्चा मंजुरीस व सदर कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय -दलित वस्ती सुधारणा योजनेमधुन सिध्दार्थ नगर भागातील २० लाख लिटर्स क्षमतेची पाण्याची टाकी बांधणे कामाबाबत.

वरील विषयान्वये, विनंती रिपोर्ट देणेत येतो की, सदरचे प्रस्तावीत कामाबाबत महापालिकेने दि.३०/४/२००७ रोजी जाहीर निविदा मागविल्या असता एकूण ३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी श्री. एसी. कोठारी यांची निविदा कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१ % अधिकची आहे. त्यानंतर त्यांना समक्ष बोलावून दि.१६/६/०७ रोजी दराबाबत वाटाघाटी केल्या असता त्यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७% अधिक दराने करण्यास तयार असल्याबाबत लेखी पत्र दिले आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रक हे सन २००५-२००६ च्या दरसुचीप्रमाणे केलेले असून सन २००६-२००७ च्या दरसुचीप्रमाणे सुधारीत अंदाजपत्रक केले असता मूळ रक्कमेच्या ५.५०% अधिक रक्कम वाढत आहे. तसेच शासनाने जा.क्र.सा.बां.म.ना./ प्रशा-४/२९५३/२००७ अन्वये दि.१/५/२००७ पासून सिमेंट,स्टिलचे नवीन, सुधारीत दर लागू केलेले आहेत. तसेच सदर कामासाठी लागणारे स्ट्रक्चरल डिझाईन उपलब्ध नसलेने स्ट्रक्चरल डिझाईनर श्री. अभय खानदेशे यांचेकडून सदर कामासाठी लागणारे स्टिल व सिमेंट यांचे तसेच पंपींग मशनरी यांचे अंदाजपत्रक मागविले असता त्यांनी लेखी पत्राद्वारे खुलासा केला असुन त्याप्रमाणे स्टिल व सिमेंटचा फरक सध्याच्या दरासुचीशी तुलना केली असता सदरचे काम हे १४.२७ % अधिक जाते (सोबत सविस्तर अहवाल)

तसेच निविदेतील पंपींग स्टेशनसाठी लागणारी यांत्रिक सामग्रीचे दर हे अंदाजपत्रकापेक्षा वाढलेले आहेत. या सर्व बाबींचा विचार करता सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक हे २२.१२ % अधिक होत आहे. तसचे सर्वात कमी दराच्या ठेकेदाराने **सदर काम मूळ अंदाजपत्रकापेक्षा २७% ज्यादा दराने करण्यास तयार असलेचे लेखी पत्र दिले आहे. म्हणजेच सुधारीत अंदाजपत्रकापेक्षा ४.८८ % ज्यादा दराने काम करणेस तयार असलेबाबत लेखीपत्र दिले आहे.सध्याचा बाजार भाव पाहता. सदर दर योग्य वाटतात. तथापी सदर बाबत छाननी समितीपुढे निर्णयास्तव सादर.**

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

अं.लेखा परिक्षक :- **'अ '** प्रमाणे मान्यतेस शिफारस आहे. दि.२२/६/०७

मा.सादर,

**विषय** :- नागरी दलीत वस्ती सुधारणा योजनेतुन सिध्दार्थनगर भागासाठी २० लक्ष लिटर्स क्षमतेची पाण्याची टाकी बांधणे संपवेल पंपींग मशिनरी पाईप लाईन टाकणे इ. कामे करणे बाबत.

निविदा दरपत्रके छाननी समितीच्या दिनांक २६/६/०७ रोजी झालेल्या बैठकीत वरील काम मे.ए.सी.कोठारी, अ.नगर यांचे आलेले दर निविदांपैकी सर्वात कमी परंतु इतर निविदा दरापेक्षा ३१ % जादा दराची प्राप्त झाली. सदर कामाचे अंदाजपत्रक सन २००५-२००६ चे दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे. म.जि.प्रा.कडील सन २००६-२००७ चे दराशी तुलना करता सदरचे दर ५.५०% जादा (मुळ अंदाजपत्रकापेक्षा) येत आहेत. तसेच शासनाच्या नविन परिपत्रकामप्रमाणे (सार्व.बांधकाम मंडळ,ना/प्रशा-४/२९५४/२००७ दि.२४/३/०७) दि.१-५-०७ पासुन सिमेंट व स्टिलचे सुधारीत दर लागु केलेले आहेत, त्यानुसार दर पृथःकरण केले असता १४.२७ % जादा दराने होत आहे.

ठेकेदार मे.ए. सी.कोठारी अ.नगर यांच्या दि.१९/६/०७ रोजीचे पत्रान्वये अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७% जादा दराने काम करण्यास तयार असल्याचे कळविले असुन सन२००६-०७ चे दरसुचीपेक्षा ४.८८ % जादा येतात. सदर दर वाजवी असल्याने निविदाधारकास सन २००६-२००७ चे दरसुचीतपेक्षा ४.८८% जादा दराने देणे बाबत समितीने शिफारस केली आहे.

तरी सदर दर योग्य वाटतात त्यामुळे सदर काम सन २००६-२००७ चे दरसुचीपेक्षा ४.८८ % जादा दराने योग्य वाटते तरी सदर प्रस्ताव अंतीम मंजुरीस्तव स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य वाटते मंजुरीस्तव सादर.

येणे प्रमाणे उपशहर अभियंता,श्री.आर जी.सातपुते यांचा अहवाल असे दि.३/७/०७

शहर अभियंता श्री. एन.बी.मगर :- छाननी समितीच्या शिफारसीनुसार सदर काम निविदा धारक मे.ए.सी. कोठारी यांना सन २००६-०७ चे दरसुचीपेक्षा ४.८८ %जादा दराने देणेची समितीकडून शिफारस करण्यात आली असून मंजूरीस्तव सादर. दि.३/७/२००७

अं.लेखा परिक्षक :- सादर, छाननी समितीचे निर्णयानुसार (४.८८ % Above) मान्यता देणेस हरकत नाही. दि.३/७/०७

प्र.उपायुक्त :- प्रस्तावा प्रमाणे मान्यतेस सादर दि.४/७/०७

कामांचे नांव :- सिध्दार्थनगर भागात २० लक्ष लीटर क्षमतेची पाण्याची टाकी बांधणे

फेर सादर,

सदरील सिध्दार्थनगर भागातील पाण्याची टाकी बांधकाम (अंदाजपत्रकीय रक्कम ९०,४१,३४१/-) नागरी दलीत वस्ती सुधारणा योजना अंतर्गत हाती घेण्यात आले होते. परंतु मा. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पाण्याच्या टाकी जागेबाबत जिल्हा परिषदेचे ना हरकत प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे प्रस्ताव प्रंलबीत ठेवण्यात आल्याचे कळविले आहे. महानगरपालिकेच्या महासभेने सदर कामाविषयी चर्चा होवुन सदर काम महानगरपालिका फंडातील मागासवर्गीय कल्याणकारी योजना या लेखाशिर्षका अंतर्गत हाती घेणे बाबत सन २००७-२००८ चे अंदाजपत्रकामध्ये १ कोटी ची तरतूद करण्यात आली आहे व पाण्याची टाकी बांधणे या लेखाशिर्षकाखाली रूपये ५० लाख ची तरतूद दर्शविली आहे.

तरी सदर काम मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत हाती घेणे योग्य वाटते. तरी सदर कामास मान्यता मिळणे बाबत मंजुरीस्तव सादर.

येणे प्रमाणे प्र.उप शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि.१७/७/०७

शहर अभियंता श्री.एन.बी. मगर :- अहवालाप्रमाणे सदर कामासाठी २००७-०८ च्या अंदाजपत्रकामध्ये मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत (म.न.पा. फंडातील ) रू. ५०,००,०००/- ची तरतूद केलेली असून सदर लेखाशिर्षकांतर्गत सदर कामास व निविदा दरास मान्यता देणे योग्य वाटते निर्णयास्तव सादर. दि. १८/७/०७

अं.लेखा परिक्षक :- फेर सादर, शहर अभियंता यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे मागावर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत अंदाजपत्रकीय तरतूद १ कोटी रूपये व मागासवर्गीय कल्याण कारी योजनेतुन पाण्याची टाकी बांधणे रक्कम रू.५० लाख तरतूद आहे. सदरील तरतूदी मधुन रक्कम **रू.९०,४१,३४१/- चे खर्चास मान्यता देणेस व छाननी समितीचे निर्णयानुसार रक्कम रू.४.८८%जादा दराने मान्यनेस्तव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस हरकत नाही.दि.१९/७/०७**

मा.उपायुक्त साहेब :- **'अ'** प्रस्तावीत नुसार मान्यता देणेस हरकत नाही. दि.२०/७/०७

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही. दि.२०/७/०७

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. जोशी अ.सु. व मा.श्री. तिवारी सु.र. :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- सदर कामाची मुदत किती आहे.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- अठरा महिने मुदत आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- काम मुदतीतच पूर्ण करण्यांत यावे प्रस्ताव मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करावा पंरतु अशा प्रकराच्या मोठ मोठया रकमेची आणि मोठ मोठी कामे स्थायी समिती मंजूर करते त्या कामांचे शुभारंभ अगर उद्घाटनाचे प्रसंगीचे कार्यक्रम पत्रिके वर स्थायी समितीचा उल्लेख नसतो. सदस्यांचे नावांला डावलेले जाते हे होउ नये.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सिध्दार्थनगर पाणी पुरवठा योजने अंतर्गत सिध्दार्थ नगर येथे २० लक्ष लिटर क्षमतेची पाण्याची टाकी बांधणे संपवेल, पंपींग मशिनरी व पाईप लाईन टाकणेचे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजनेचे तरतूदी मधून करणेस व एस्टीमेट रूपये ९०,४१,३४१/- (रूपये नव्वद लाख एक्केचाळीस हजार तीनशे एक्केचाळीस फक्त)चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच सदर कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दरांचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केलेल्या मे.ए.सी. कोठारी अहमदनगर यांचे स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदादरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करावी

सुचक :- मा.श्री. जोशी अ.सु.

अनुमादेक :- मा.श्री. तिवारी सु.र.

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिति सभा क्रमांक-६
## सन २००७-२००८.

विषय क्रमांक -६ शुक्रवार दिनांक ३/८/२००७

ठराव क्रमांक -६ शुक्रवार दिनांक ३/८/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे एप्रिल २००६ ते मार्च २००७ अखेरचे महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम क्रमांक ५९(१) नमुना क्रमांक २७ प्रमाणे तयार केलेले बाबवार जमा खर्चाचे वार्षिक लेखे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये मंजुरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकुर :-** सादर, महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.५९ (१) नमुना क्र.२७ प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचा एप्रिल २००६ ते मार्च २००७ अखेर बाबवार जमा-खर्चाचे वार्षिक लेखे तयार करण्यात आलेले असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३) अन्वये "नगरपालिकेच्या मुख्य लेखापरिक्षकाने प्रत्येक सरकारी वर्षाच्या संपुर्ण लेख्यावरील आपला अहवाल मा.स्थायी समितीस सादर केला पाहिजे " असे नमुद करण्यात आले आहे.

**तरी मुख्य लेखापरिक्षकांचा अहवाल घेउन मा.स्थायी समिती सभेपुढे मंजुरीस ठेवणेसाठी आपले स्तरावर आदेश होणेस विनंती.**

येणे प्रमाणे मुख्य लेखाधिकारी यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त साहेब (सा):- **"अ"** प्रस्तावीत स्थाई समिती समोर सादर करणे योग्य दि.१७/७/०७

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. जोशी अ.सु. व मा.श्री. तिवारी सु.र :- विषय क्रमांक सहा व सातचे तक्ते ऑफीस रिपोर्टा बरोबर सदस्यांना मिळलेले नाहीत.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ. :- विभाग प्रमुखांना सभेमध्ये बोलवावे.

त्याप्रमाणे मुख्य लेखाधिकारी श्री. कर्डिले पी.जे. व श्री. लोंढे अकौंट विभाग लिपीक हे सभे मध्ये उपस्थित झाले.

मा.श्री. तिवारी स.ुर. :- विषय क्रमांक सहा सातचे मिळाले नाहीत.

श्री. लोंढे अकौंट विभाग:- मा.स्थायी समितीकडे पाठविलेल्या प्रस्तावा बरोबर सदर तक्त्यांची एकच प्रत पाठविलेली होती.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब:- पुढील वेळी सर्व विषयांची परिपूर्ण माहिती सर्व मा. सदस्यांना देण्यांत येईल.

मा.श्री. जोशी अ.सु.:- मी सावेडी भागाचे वसुली विषयी माहिती चार महिन्या पूर्वी मागितली होती ती अद्याप ही मला मिळालेली नाही. आपले अंदाजपत्रकीय सभेच्या वेळी डिमांड रजिस्टर अपूर्ण असले बाबत विषय उपस्थित होतो परंतु या प्रश्ना कडे गांभिर्याने पाहिले जात नाही.कार्यवाही होत नाही.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- आपले मागणी प्रमाणे माहिती देउ
मा.श्री. जोशी अ.सु. :- आजच्या घडीला म.न.पा. चा किती देणी आहेत हे सांगावे.
अकौंटन्ट श्री. परशरामी :- एकशे बेचाळीस कोटी आहेत व ते जिवन प्राधिकरणाचे आहेत.
मा.श्री. जोशी अ.सु. :- आपली किती देणी आहेत.
मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- महानगरपालिकेच्या वेगवेगळया विभागाकडेस अधिका-याकडे बीले प्रोसिजर मध्ये असतात त्यामुळे अशी आकडेवारी एकाच वेळी उपलभ्द होत नाही.
मा.श्री. घुले अ.ह. व मा.श्री. बोरूडे अ.व. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.
मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक सहा आणि सात सर्वानुमते मंजूर करावा.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपालिकेचे एप्रिल २००६ ते मार्च २००७ अखेरचे महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम क्रमांक ५९(१) नमुना क्रमांक २७ प्रमाणे तयार केलेले बाबवार जमा खर्चाचे वार्षिक लेखे मंजूर करण्यांत येत आहेत. अखेर मंजूरी साठी मा.महानगरपालिका सभेकडेस सादर .

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. घुले अ.ह.

अनुमोदक :- मा.श्री. बोरूडे अ.व.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-६**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक -७ शुक्रवार दिनांक ३/८/२००७

ठराव क्रमांक -७ शुक्रवार दिनांक ३/८/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे मार्च २००७ अखेरचे महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम ६० व ६१ नमुना क्रमांक २८ व २९ प्रमाणे तयार केलेले मत्ता दायित्व व वार्षिक लेख्यांचा सारांश मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये मंजुरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकुर :-** सादर, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३) अन्वये " नगरपालिकेच्या मुख्य लेखापरिक्षकाने प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर महानगरपालिकेच्या मागील सरकारी वर्षाच्या संपुर्ण लेख्यावरील आपला अहवाल मा.स्थायी समितीस सादर केला पाहिजे " असे नमुद करण्यात आले आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.६०नमुना क्र.२८ प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचा एप्रिल २००६ ते मार्च २००७ अखेर वार्षिक लेख्याचा सारांश तयार करण्यात आला असुन यात सुरवातीचे शिलकेसह रू.१ अब्ज २ कोटी ७३ लाख ४६ हजार ९३४ इतके जमा झाले असुन ७४ कोटी ८७ लाख ३३ हजार ५०४ रूपये खर्च वजा जाता रू.२७ कोटी ८६ लाख १३ हजार ४३० इतकी अखेरची शिल्लक राहिली.

तसेच नियम नं.६१ नमुना नं.२९ प्रमाणे ३१ मार्च २००७ अखरेचे मत्ता व दायित्व तयार करण्यात आलेले असुन यात मत्ता हे ६३ कोटी ९२ लाख २ हजार ८७० असुन दायित्व २ अब्ज ०६ कोटी ८४ लाख ५१ हजार ७७६ असुन दायित्व हे मत्तेपेक्षा १ अब्ज ४२ कोटी ९२ लाख ४८ हजार ९०६ ने अधिक आहे.

**तरी मुख्य लेखापरिक्षकांचा अहवाल घेउन मा.स्थायी समिती सभेपुढे मंजुरीस ठेवणेसाठी आपले स्तरावर आदेश होणेस विनंती**

येणे प्रमाणे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना अहवाल असे

मा.उपायुक्त साहेब (सा) :-**"अ"** प्रस्तावीत नुसार स्थाई समिती समोर सादर करणे योग्य दि.१७/७/२००७

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**ठराव** :-अहमदनगर महानगरपालिकेचे मार्च २००७अखेर चे महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम ६०व ६१ नमुना क्रमांक२८व २९ प्रमाणे तयार केलेले मत्तादायित्व व वार्षिक लेख्यांचे सारांशास मंजूरी देण्यांत येत आहे अखेर मंजूरीसाठी मा.महानगरपालिका सभेकडेस सादर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. घुले अ.ह.

अनुमोदक :- मा.श्री. बोरूडे अ.व.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.